**पोलीस उप-आयुक्त, विशेष शाखा, पुणे शहर**
पोलीस आयुक्त कार्यालय, २, साधु वासवाणी पथ, पुणे- ४११००१
फोन नं.०२०-२६२०८२८६/२६२०८२०२/२६१२३६६७
Email – sbpisecurity-pune@nic.in

जा.क्र.पोउआ/विशा/सुरक्षा/संरक्षण/९८२२/२०२३ पुणे, दिनांक :- १८/०९/२०२३

**विषय :- सार्वजनिक गणेशोत्सवचे अनुषंगाने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश.**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की,

१) ज्या अर्थी दहशतवादी/ राष्ट्रविरोधी घटक ड्रोन,रिमोंटकंट्रोल, मायको-लाईट, एअरक्राप्ट, पॅराग्लायडरचा वापर करुन त्यांचे हल्यामध्ये आणि त्याव्दारे व्हीआयपी/व्हीव्हीआयपीना लक्ष करु शकतात तसेच मोठया प्रमाणावर सार्वजनिक जीवन धोक्यात आणु शकतात,सार्वजनिक मालमत्तेची नासधुस करु शकतात, आणि पुणे शहर पोलीस आयुक्तालय क्षेत्रात कायदा व सुव्यवस्था बिघडवु शकतात

२) त्याअर्थी ड्रोन,रिमोंट कंट्रोल मायको-लाईट एअर क्राप्ट पॅराग्लायडर व्दारे संभाव्य घातपात रोखण्यासाठी पुणे शहर पोलीस आयुक्तालयात अशा घटकांच्या कारवाया, ज्या साठी काही प्रतिबंधात्मक सक्रीय उपाय योजना करणे आवश्यक आहे.

३) म्हणुन मी आर.राजा पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा पुणे शहर आणि कार्यकारी दंडाधिकारी मला फौजदारी प्रक्रिया संहिता सन-१९७३ चे कलम १४४ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराव्दारे ड्रोन,रिमोंट कंट्रोल, मायको-लाईट, एअरक्राप्ट, पॅराग्लायडर,पॅरामोटर,हॅन्डग्लायडर,हॉट एअर बलुन इत्यादीच्या उड्डान क्रियांना पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात **पुढील ११ दिवसाठी म्हणजे १९/०९/२०२३ ते २९/०९/२०२३ रोजी पर्यंत** देत आहे.पुणे शहर पोलीसांकडुन हवाई पाळत ठेवणे किंवा पोलीस उप आयुक्त विशेष शाखा पुणे शहर यांचे लेख्र्ी विशिष्ट परवानगिने करण्यात येणारी कारवाई अपवाद राहील.

**४) हा आदेश पुणे शहरातील सार्वजनिक गणेश उत्सवाचे अनुषंगाने दिनांक १९/०९/२०२३ रोजी ००.०१ पासुन दिनांक २९/०९/२०२३ रोजी २४.०० वाजे पर्यंत लागु राहील.**

५) या आदेशाचे उल्लघंन करणारी कोणतीही व्यक्ती भारतीय दंड सहिंता १८६०च्या कलम १८८ अन्वये दंडनिय असेल.

६) सर्व संबधितांना वैयक्तिक रित्या नोटीस बजावली जावु शकत नसल्यामुळे याव्दारे एकतर्फी आदेश पारित करण्यात आला आहे.लोकांच्या माहीतीसाठी प्रसार माध्यमाव्दारे सर्व पोलीस ठाणे सर्व स.पो.आ.सर्व पो.उ.आ.महानगरपालीका तहसिल ऑफीसच्या नोटीस बोर्डावर प्रती चिटकवुन प्रकाशित केले जाईल.

**सदरचा आदेश माझ्या सही शिक्क्यानिशी आज दिनांक १८/०९/२०२३ रोजी दिला आहे.**

( आर.राजा )
पोलीस उप आयुक्त,
विशेष शाखा पुणे शहर

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :- १८/०९/२०२३

PC-2/2023/Drone/Noting